ePaper

लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई होणार?

वर्ष - 8 । अंक - 351 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

**आतील पानांत**

- आम्हाला ऐकून धक्काच बसला!
- दिव्या देशमुखची अद्भुत घोडदौड!
- विरांच्या पराक्रमाला जगाचा पाठिंबा!
- ३० मिनिटांमध्ये पाकिस्तानसमोर सरेंडर

www.mahaenews.com । बुधवार, दि. 30 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय!

# गाव-खेड्यांचा होणार कायापालट!

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाच्या निर्णयांमुळे ग्रामीण भागांतील विकासाचे मार्ग खुले

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज



**राज्य मंत्रिमंडळाच्या आज पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ग्रामीण विकास, कृषी, महिला सक्षमीकरण आणि न्यायदान यंत्रणेच्या मजबुतीसह विविध क्षेत्रांत ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे राज्यातील ग्रामीण भागांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित होणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना बळ मिळणार आहे. शेतकरी, महिला बचतगट, वकिलांसह सर्वसामान्य जनतेसाठी दिलासादायक बाब म्हणजे हे निर्णय प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत.**

#### 1. 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'

ग्रामविकास विभागाच्या वतीने राज्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबवले जाणार आहे. या अभियानाअंतर्गत राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहेत. एकूण १,९०२ पुरस्कार देण्यात येणार असून, ग्रामस्तरावर नवचैतन्य आणि कार्यक्षम प्रशासन निर्माण करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

#### 2. महिला बचत गटांसाठी 'उमेद मॉल' – हक्काची बाजारपेठ

'उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' म्हणजेच जिल्हा विक्री केंद्रे स्थापन केली जाणार आहेत. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना या माध्यमातून थेट बाजारपेठ उपलब्ध होणार असून, त्यांना आर्थिक सक्षमता मिळणार आहे.

#### 3. 'ई-नाम' योजनेला बळ – कृषी बाजारपेठेचा विस्तार

सहकार व पणन विभागाच्या अंतर्गत 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासाठी राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन केले जातील. त्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या नियंत्रण व विकासासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

#### 4. महिलांवरील अत्याचार प्रकरणांसाठी न्यायालये

महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी रत्नागिरी, वाशिम आणि गोंदिया येथे विशेष न्यायालयांची स्थापना केली जाणार आहे. त्यामुळे अशा प्रकरणांचा निपटारा जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

#### 5. पिंपरी-चिंचवडमध्ये दोन नवी न्यायालये

पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन नव्या न्यायालयांची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक न्यायिक पदांना मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे.

#### 6. वर्धा जिल्ह्यातील 2 सिंचन प्रकल्पांसाठी निधी

जलसंपदा विभागाच्या अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील दोन महत्वाच्या प्रकल्पांना एकूण ४२८ कोटी ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे:

**बोर मोठा प्रकल्प (ता. सेलू): २३१.६९ कोटी रुपये**

**धाम मध्यम प्रकल्प (ता. आर्वी): १९७.२७ कोटी रुपये**

या दोन्ही प्रकल्पांच्या विशेष दुरुस्ती आणि वितरण व्यवस्थेच्या नूतनीकरणासाठी ही आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

#### 7. वकिलांसाठी 'ॲडव्होकेट अकॅडमी'साठी जमीन

महाराष्ट्र व गोवा वकील परिषद, मुंबई यांना 'ॲडव्होकेट अकॅडमी' स्थापन करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे कळवा येथे शासकीय जमीन देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या उपक्रमामुळे कायदाक्षेत्रातील नवोदित वकिलांना प्रशिक्षण व संशोधनासाठी भक्कम व्यासपीठ मिळणार आहे.

### हे निर्णय ग्रामीण महाराष्ट्राच्या कायापालटाचे शिल्पकार ठरतील...

आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले गेलेले हे निर्णय गावपातळीवर विकासाला चालना देणारे ठरणार आहेत. महिलांच्या सक्षमीकरणापासून ते शेतकऱ्यांच्या हक्काच्या बाजारपेठेपर्यंत आणि न्याययंत्रणेत गती आणण्यापर्यंतचा सर्वांगीण विचार या निर्णयांतून दिसून येतो. हे निर्णय ग्रामीण महाराष्ट्राच्या कायापालटाचे शिल्पकार ठरू शकतात.

# कार्यालयात जाण्यासाठी पर्यावरणपूरक पर्याय!

## रूटमॅटिक-इन्फोसिसच्या भागीदारीमुळे भविष्यात मोठा बदल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील नोकरदारांना कामावर जाण्यासाठी पर्यावरणपूरक पर्याय आता उपलब्ध झाला आहे. यासाठी कृत्रिम प्रज्ञाआधारित कार्यालयीन वाहतूक मंच (कॉर्पोरेट मोबिलिटी प्लॅटफॉर्म) असलेल्या रूटमॅटिकने इन्फोसिसच्या सहकार्याने पर्यावरणपूरक वाहनांचा नवीन ताफा सुरू केला. हा ताफा १०० टक्के डिझेल आणि पेट्रोलमुक्त आहे.**




या ताफ्यात सीएनजी आणि इलेक्ट्रिक इंधन पर्यायाच्या चार आणि सहा आसनी मोटारींचा समावेश आहे. यामुळे शहरातील प्रदूषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे. पुण्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे प्रदूषणातही वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांत वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रस्ते अपुरे पडू लागले आहेत. यामुळे शहरात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छ वाहतुकीच्या दिशेने रूटमॅटिकने पाऊल टाकले आहे. यासाठी इन्फोसिसशी भागीदारी केली आहे.यामुळे शहरात कार्यालयीन वाहतूक क्षेत्रात पर्यावरण वाहतुकीच्या दिशेने पाऊल पडले आहे. यामुळे शहरातील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी याचा फायदा होणार असून, नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा होणार आहे.याबाबत रूटमॅटिकचे संस्थापक व मुख्याधिकारी श्रीराम कन्नन म्हणाले की, पुण्यात हरित वाहतुकीचा नवा मानदंड स्थापित करण्याची आघाडी आम्ही घेतली आहे. शहरात १०० टक्के डिझेल आणि पेट्रोलमुक्त वाहतूक सेवा सुरू करण्याचे पहिले पाऊल आम्ही उचलले आहे. यातून शाश्वत भविष्यासाठी कार्यालयीन वाहतूक क्षेत्रात अमूलाग्र बदलाच्या दिशेने वाटचाल अपेक्षित आहे.

आयक्यूएअरच्या जागतिक हवा गुणवत्ता अहवाल २०२४नुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरांपैकी १३ शहरे भारतातील आहेत. या वाढत्या प्रदूषणामध्ये वाहनांमुळे होणाऱ्या हवा प्रदूषणाचा मोठा वाटा आहे. रूटमॅटिकचा हा उपक्रम देशातील प्रदूषण कमी करण्यासाठी एक योग्य पाऊल ठरेल, अशी आशा आहे.रूटमॅटिकची स्थापना २०१३ मध्ये झाली. ही वाहतूक सेवा कंपनी आहे. कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून कंपनीकडून प्रवाशांना सुरक्षित व विश्वासार्ह सेवा दिली जाते. कंपनी सध्या २३ शहरांतील ३०० कंपन्यांमध्ये साडेतीन लाख कर्मचाऱ्यांना सेवा पुरवते. रूटमॅटिकला ४कोटी डॉलरची महत्त्वाची गुंतवणूक मिळाली आहे. ही गुंतवणूक कंपनीला भविष्यातील सेवा विस्तारासाठी महत्त्वाची ठरेल. कंपनीने मार्च २०२६ पर्यंत १० हजार वाहने ताफ्यात आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.या ताफ्यात सीएनजी आणि इलेक्ट्रिक इंधन पर्यायाच्या चार आणि सहा आसनी मोटारींचा समावेश आहे. यामुळे शहरातील प्रदूषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे.

### साडेतीन लाख कर्मचाऱ्यांना सेवा

पुण्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे प्रदूषणातही वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांत वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रस्ते अपुरे पडू लागले आहेत. यामुळे शहरात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छ वाहतुकीच्या दिशेने रूटमॅटिकने पाऊल टाकले आहे. यासाठी इन्फोसिसशी भागीदारी केली आहे.यामुळे शहरात कार्यालयीन वाहतूक क्षेत्रात पर्यावरण वाहतुकीच्या दिशेने पाऊल पडले आहे. यामुळे शहरातील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी याचा फायदा होणार असून, नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा होणार आहे.

# बारामती शहरात दिवसा अवजड वाहनांना बंदी!

## रात्री नऊ ते सकाळी सात या वेळेत वाहतुकीला परवानगी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बारामती शहरात अपघाताचे प्रमाण वाढल्याने अवजड वाहनांना सकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत बंदी घालण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. रात्री नऊ ते सकाळी सात या वेळेतच या वाहनांना शहरात प्रवेश करता येणार आहे. शहरातील भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**



या वेळी मुख्याधिकारी पंकज भुसे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास नाळे, मोटार वाहन निरीक्षक बजरंग कोरावले आदी उपस्थित होते.बारामती शहर व परिसरात प्रमाणापेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या ट्रक आणि वाहनांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत ४५ वाहने जप्त करण्यात आली आहेत. या वाहनमालकांवर खटले दाखल करून ते बारामतीतील प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, शहर पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी ही कारवाई सुरू केली आहे. जप्त करण्यात आलेल्या ४५ वाहनांच्या मालकांवर खटले तयार करून ते प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले असल्याचे चंद्रशेखर यादव यांनी सांगितले.बारामती परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी, मुरुम आणि इतर बांधकाम साहित्याची वाहतूक ट्रकमधून होत असते. मात्र, या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक माल भरला जात असल्याने रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच अपघातही होत आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करत पोलिसांनी ही कारवाई सुरू केली आहे. जप्त केलेली वाहने बारामती वाहतूक शाखेच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहेत.नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून वाहतूक शाखेकडून कारवाई सुरू आहे. अपघातात मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. नागरिकांनी, वाहनचालकांनी सजग राहून वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. से, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विलास नाळे, मोटार वाहन निरीक्षक बजरंग कोरावले आदी उपस्थित होते.बारामती शहर व परिसरात प्रमाणापेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या ट्रक आणि वाहनांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. या वाहनमालकांवर खटले दाखल करून ते बारामतीतील प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले.

### 45 वाहनांवर कारवाई

जप्त करण्यात आलेल्या ४५ वाहनांच्या मालकांवर खटले तयार करून ते प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले असल्याचे चंद्रशेखर यादव यांनी सांगितले.बारामती परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी, मात्र, या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक माल भरला जात असल्याने रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच अपघातही होत आहेत.

### राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रीमंडळाची प्रस्तावाला मान्यता

# पिंपरी-चिंचवडसाठी, जिल्हा, अतिरिक्त सत्र न्यायालयाची स्थापना!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी न्याय क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकण्यात आले असून, येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली आहे. तसेच, राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत या न्यायालयांसाठी आवश्यक पदांना मंजुरीही देण्यात आली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातील पक्षकार आणि विधीतज्ज्ञांकडून गेल्या अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवड न्यायालयाचा विस्तार व्हावा, अशी मागणी होत होती. याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

वास्तविक, दि. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न सुटला नव्हता. पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक व नागरी शहरात स्वतंत्र न्यायालयांची गरज गेल्या अनेक वर्षांपासून भासत होती. पक्षकारांना आणि वकिलांना न्यायासाठी पुण्याला जावे लागणे, वेळ आणि पैसा वाया जाणे, यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.

आमदार महेश लांडगे यांनी ही गरज ओळखून विधि व न्याय विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या हद्दीत बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील सेक्टर नंबर – १४ येथे सुमारे १६ एकर क्षेत्राची जागा महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेली आहे. या ठिकाणी पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुल उभारणीची पायाभरणी करण्यात आली आहे. आता जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली आहे. भाजपा महायुती सरकारच्या या सकारात्मक भूमिकेचे विधी क्षेत्रातील तज्ञ आणि पक्षकारांमधून स्वागत होत आहे.

> “जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना हा निर्णय हा पिंपरी-चिंचवडकरांच्या न्यायहक्काचा विजय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. हे न्यायालय फक्त एक इमारत नसून, हे न्यायासाठी वाट पाहणाऱ्या हजारो नागरिकांच्या अपेक्षांचे केंद्र असेल.”
>
> **-महेश लांडगे, आमदार,**
> भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### शहराचा न्यायिक दर्जा उंचावणार..!

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अशा दोन न्यायालयांची स्थापना केली. या न्यायालयांच्या स्थापनेमुळे आता पक्षकारांची गैरसोय टळणार आहे. स्थानिक वकिलांना संधी मिळणार आहे. न्यायप्रक्रियेला गती मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा न्यायिक दर्जा उंचावणार आहे.

---

# २३ कोटी खर्चून बांधलेला सिमेंट रस्ता दहा महिन्यात उखडला!

## पालिकेच्या दाव्यांचे वाभाडे; नागरिकांचा संताप; रस्त्यावर भेगा, ठेकेदाराकडून मलमपट्टी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे गुरव येथील सृष्टी चौक ते शंकरवाडीपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, या रस्त्यावर पालिकेकडून २३ कोटी ३९ लाख ९७ हजार रुपये खर्च करूनही काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे रस्त्याच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.**



दरम्यान दहा महिन्यातच या रस्त्याला भेगा पडल्यामुळे गुणवत्तापूर्ण कामाबाबत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात येत असलेल्या दाव्यांचे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत.

वाहतुकीसाठी हा रस्ता सुरू केल्यापासून गेल्या वर्षभरात दोन वेळा रस्ता दुरुस्तीसाठी उखडण्यात आला. मागील महिन्यात रस्त्याला पडलेली दहा मीटरची भेग (क्रॅक) दुरुस्त केल्यानंतर काही दिवसांतच पुन्हा रस्त्याला एक ते दीड इंच रुंद आणि दहा मीटर लांबीची भेग पडली. ती दुरुस्त करण्यासाठी ठेकेदाराने रस्ता उखडला होता. करोडो रुपये खर्च करूनही रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याचा स्थानिक नागरिकांकडून आरोप होत आहे.

दहा महिन्यांपूर्वी हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मात्र, काही दिवसांतच शंकरवाडी येथील घनकचरा स्थानांतर केंद्रासमोर रस्त्याला दोन इंचाची दहा मीटर लांब भेग पडली होती.दोन्ही बाजूंनी रस्ता बंद करून दुरुस्ती काम करण्यात आले. याला महिनाभराचा कालावधी उलटला नाही, तोवर पुन्हा याच ठिकाणी एक ते दीड इंचाची दहा ते पंधरा मीटर लांब भली मोठी भेग पडली. ती दुरुस्त करण्यासाठी पुन्हा रस्ता उखडण्यात आला. रस्त्यावर बॅरिकेड लावून भेग पडलेला पॅच उखडून त्याची कॉंक्रीट भरून दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्हे उपस्थित झाले आहे.

### करोडोंचा खर्च तरीही भेगा

या सिमेंट रस्त्यावर तब्बल २३ कोटी ३९ लाख एवढा खर्च करण्यात आला. रस्त्याला ठिकठिकाणी भेगा पडू लागल्या आहेत. यावरून निकृष्ट दर्जाचा रस्ता केल्याचे स्पष्ट होत आहे. स्थानिक आमदार, माजी नगरसेवक यावर कोणीच याबाबत बोलत नसल्याने सर्वांचीच मिलिभगत असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.यावरून स्पष्ट होत आहे.

> “ सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याला भेगा पडल्या होत्या. रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराचा देखभाल दुरुस्ती कालावधी पाच वर्षांचा आहे. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती करून देणे ठेकेदाराला बंधनकारक आहे. त्यानुसार रस्त्याची दुरुस्ती करून घेण्यात आली.
>
> **-सुनील दांगडे,** उपअभियंता महापालिका

# जम्मू-काश्मीरमधले असेही ‘विलीनीकरण’!



भूमिका

**केंद्रात ‘एनडीए-३.०’ सरकार स्थापन झाल्यापासून भाजपप्रणीत केंद्र सरकारला अनेक निर्णय मागे का घ्यावे लागत आहेत, याची चर्चा वक्फ विधेयक, उच्चपदांवर थेट भरतीची जाहिरात, ब्रॉडकास्ट दुरुस्ती विधेयक, भांडवली नफ्यावरील करआकारणी पद्धत या प्रसंगांतून पुढे जाते आहेच.**

त्यावर, हे निर्णय सरकारचे होते, आघाडी सरकार चालवताना तडजोडी कराव्या लागतात, घटक पक्षांचा दबाव असतो असा युक्तिवाद असू शकतो. लोकसभेत भाजपकडे बहुमत नसल्याने मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारसमोर अडचणी येत असतील तर ‘मध्यममार्ग काढला गेला असेल’ असेही म्हणता येईल. पण आता भाजपला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत घेतले गेलेले पक्षाचे निर्णयही मागे घ्यावे लागत असतील तर हा भाजपला मिळालेला काव्यगत न्याय म्हणायचा की आणखी काही हे ज्याचे त्याने ठरवावे. याचे उदाहरण असे की, जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या ४४ उमेदवारांची यादी घोषित केल्यानंतर पक्षांतर्गत रोषापुढे नमते घेऊन दोन तासांमध्ये ही यादीच मागे घ्यावी लागली. मोदी-शहांची पोलादी पकड असलेल्या या पक्षामध्ये उघड ‘बंडखोरी’ व्हावी आणि केंद्रीय नेतृत्वाला एक पाऊल तात्पुरते का होईना मागे घ्यावे



लागावे ही घटना ‘ऐतिहासिक’च म्हटली पाहिजे! जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षामध्ये काळ कसा सोकावला असेही कोणी विचारू शकेल. झाले असे की, जम्मू आणि काश्मीर विभागांतील तीनही टप्प्यांतील उमेदवारांची सोमवारी भाजपने घोषणा केली. या यादीत बाहेरून आलेल्या नेत्यांचा भरणा झाल्याचे दिसताच भाजपचे जुने ‘संस्कारी’ नेते संतापले. आम्ही वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाल्ल्या आणि आता सहा महिने -वर्षापूर्वी आलेल्या आयारामांना तुम्ही उमेदवारी कशी देऊ शकता, असा प्रश्न करत हे नेते जम्मूमधील भाजपच्या कार्यालयात घुसले. त्यांच्या असंतोषाचा भडका इतका की, प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न अपयशी ठरला. रैनांचा नाइलाज झाला होता, वास्तविक त्यांचेच नाव यादीत नव्हते. दोन माजी उपमुख्यमंत्र्यांनाही वगळले गेले होते. रैनांनाच उमेदवारी मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती तर ते इतर नेत्यांची काय समजूत काढणार? अखेर जम्मू भाजपमधील हा वणवा दिल्लीत पोहोचला, अचानक हल्लाबोल झाल्याने गांगरलेल्या केंद्रीय नेत्यांनी यादीच मागे घेऊन स्वत:ला वाचवले. मग, जिवात जीव आल्यावर पहिल्या टप्प्यापुरती १६ उमेदवारांची नवी यादी जाहीर केली गेली.जम्मूमधील नेते-कार्यकर्त्यांच्या उद्रेकातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या आयारामांना मिठी मारण्याच्या धोरणाला पक्षांतर्गत कडाडून विरोध होऊ लागला आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांचा हा राग महाराष्ट्रात निराळ्या प्रकारे दिसला. लोकसभा निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांमधील निरुत्साहामागे हेदेखील प्रमुख होते असे मानले जाते. भाजपमधील आयारामांचा हा विषाणू थेट जम्मू-काश्मीरपर्यंत पसरला ही पक्षासाठी धोक्याची घंटा म्हणता येईल. हा विषाणू पक्षाला पोखरून काढत असेल तर केंद्रीय नेतृत्वाने सावध होण्याची गरज आहे. पण कदाचित दिल्लीत बसलेल्या नेत्यांचा अहंकार आड येत असावा असे दिसते. भाजपने मंगळवारी दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांतील मिळून २९ उमेदवार जाहीर केले. त्यात एखादा अपवाद वगळता आदल्या दिवशी मागे घेतलेल्या यादीतील २८ उमेदवार कायम आहेत. यापैकी १२ हून अधिक ‘आयाराम’- म्हणजे गेल्या पाच वर्षांतच भाजपमध्ये आले आहेत. एखाद-दोघांनी तर गेल्या आठवड्यात पक्षात प्रवेश केला आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांचे बंधू देविंदर सिंह राणादेखील अलीकडेच नॅशनल कॉन्फरन्समधून भाजपमध्ये आले. पक्षामध्ये कष्टकरी असतात हे खरे, तेच मतदारांना मतपेटीपर्यंत घेऊन येतात हेही खरे; पण निवडणुकीत विजय मिळवायचा असेल तर दुसऱ्या पक्षातून आलेल्या ताकदवान नेत्यांना संधी द्यावीच लागेल, हे गेल्या दहा वर्षांतील धोरण भाजपने जम्मू-काश्मिरातही कायम ठेवले असे दिसते. महाराष्ट्रातील एक-एक आयाराम विधानसभा निवडणुकीत भाजपला रामराम करण्याच्या मन:स्थितीत आहेत.

## संपादकीय »

### पुतळ्याचा प्रश्न!

***देशास एकेकाळी नेतृत्व देणारा महाराष्ट्र आज त्या पुतळ्याप्रमाणे किरकोळ वाऱ्यांत उन्मळून पडलेला दिसतो...***

नव्या संसदेचे छत का गळते? नव्या मंदिरात पाणी का टपकते? नवा भुयारी मार्ग पाण्याखाली जातो कसा? याच मालिकेत नवा कोरा पुतळा पायांपासून उखडला जातोच कसा, असा प्रश्न विचारता येईल. हे सगळे प्रश्न वेगवेगळ्या प्रांतातील घटनांसंदर्भात असले तरी त्या सगळ्यांचे उत्तर एकच एक आहे. ते ‘मी’, ‘माझ्या हस्ते’ आणि ‘माझ्या कारकीर्दीत’ या तीन ‘मी’भोवती फिरते.सेतूचा वा संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाचा वा राम मंदिराचा असो! देश हा कालातीत असतो आणि त्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळालेली व्यक्ती कितीही देदीप्यमान, दैवी वगैरे असली तरी तिच्या कार्यकालास कालमर्यादा असतात. कोणताही मानव मर्त्य असतो आणि देश अनादी-अनंत. अशा वेळी आपल्या आधी कित्येक वर्षे आणि आपल्यानंतरही कित्येक वर्षे सुखासमाधानाने अस्तित्व टिकवून असलेल्या या देशाच्या कार्यकालावर आपली प्रतिमा निर्माण करण्याचा, छाप सोडण्याचा कोणी कितीही प्रयत्न केला.

काही राज्यांच्या राज्यपालांची अनावश्यक कृती आणि हस्तक्षेप लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेत भर घालणारे आहेत. मग ती विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांना मान्यता देणे असो, मंत्रिमंडळाने सुचवलेल्या व्यक्तीचा मंत्रिमंडळात समावेश असो. यासंबंधी विरोधकांनीच नव्हे तर आजीमाजी न्यायाधीशांनी खंत व्यक्त केली.

## राज्यपाल न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेत

काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीश नागरत्ना आणि माजी न्यायाधीश नरिमन यांनी राज्यपालांच्या कृतीबाबत आक्षेप नोंदवले. देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायिक सदस्यांचे हे भाष्य प्रकरणाचे गांभीर्य वाढवणारे आहे. न्यायाधीश सहसा आपल्या निकालातून भाष्य करतात. पण काही राज्यपालांच्या कृतीवर आजीमाजी न्यायाधीशांनी केलेली जाहीर टीका ही दखल घेण्याजोगी आहे.गेल्या सहा महिन्यांत न्यायाधीश नागरत्ना यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून राज्यपालांच्या भूमिकेबाबत अनेकदा खंत व्यक्त केली. या महिन्यात एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी काही राज्यांच्या राज्यपालांच्या नको तिथे अति तत्परता आणि अनावश्यक निष्क्रियतेकडे लक्ष वेधले. घटनादत्त अधिकारांचे राज्यपालांकडून पालन न होणे याविषयी त्यांनी खेद व्यक्त केला. मार्च महिन्यातील एका कार्यक्रमात त्यांनी ‘राज्यपालांना



काय करावे आणि करू नये हे सांगावे लागते. आता राज्यपालांनी घटनेने दिलेल्या अधिकारातून आपले कर्तव्य पार पाडावे हे सांगण्याची गरज आहे,’ असे मत व्यक्त केले.डिसेंबर २०२३ मध्ये एका खासगी संस्थेच्या कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश नरिमन यांनी २०२३ सालची तिसरी अस्वस्थ करणारी घटना म्हणून काही राज्यपालांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला. केरळ विधानसभेने संमत केलेल्या एका विधेयकावर राज्यपालांनी २३ महिने कुठलाच निर्णय न घेतल्याचा संदर्भ दिला. सर्वोच्च न्यायालय भविष्यात कधीतरी स्वतंत्र विचारसरणीचे लोक राज्यपाल म्हणून नियुक्त केले जावेत असा निकाल देईल, याची मी वाट बघतो आहे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. न्या. नागरत्ना, न्या. नरिमन हे काही कुठल्या राजकीय पक्षाशी निगडित नाहीत. यांची हयात सांविधानिक अधिकारांच्या कायदेशीर प्रक्रियेत गेलेली आहे. यांच्यासारख्या अनेक मान्यवरांची बांधिलकी ही कुठल्याही व्यक्ती अथवा पक्षाशी नाही तर संविधानाशी आहे. घटनातज्ज्ञ असांविधानिक कृतींवर बोट ठेवतात तेव्हा त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. म्हणूनच या दोन्ही न्यायाधीशांचे विधान गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.राज्यपालांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे काही निकाल याबाबत सखोल विश्लेषण करणारे आहेत. कायदा, सांविधानिक तरतुदी राज्यपालांना संरक्षण बहाल करतात, परंतु राज्यपालांच्या संविधानाला अभिप्रेत नैतिक आचरणाच्या अभावातून करण्यात आलेली ही निरीक्षणे सुदृढ लोकशाहीसाठी गरजेची आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रणिती शिंदे यांच्यावर देशद्रोहाचा आरोप!

## प्रणिती शिंदे यांच्या विरोधात भाजपने निदर्शने केली

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**संसदेत भारतीय लष्कराने पाकिस्तानविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून केलेल्या कामगिरीचा 'तमाशा' असा उल्लेख करून अवमान केल्याच्या निषेधार्थ सोलापूरच्या काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात भाजपने निदर्शने केली. त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करीत, त्यांच्या प्रतिमेला काळे फासून जोड्याने मारण्यात आले.**




संसदेत सध्या 'ऑपरेशन सिंदूर' वर चर्चा सुरू आहे. या चर्चेत भाग घेताना प्रणिती शिंदे यांनी भाग घेताना भारतीय लष्कराने पाकिस्तानविरोधातच्या माध्यमातून केलेल्या कामगिरीचा 'तमाशा' असा उल्लेख केला आहे. याविरुद्ध सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. याच्याच निषेधार्थ भाजपने आज आंदोलन केले.भाजपच्या सोलापूर जिल्हा कार्यालयाबाहेर झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. या वेळी कोठे म्हणाले, 'खासदार प्रणिती शिंदे यांनी केवळ राहुल गांधी यांची चापलुशी करून त्यांना खूश करण्याच्या हेतूने हे कृत्य केल्याचा आरोप केला आहे. परंतु भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून केलेल्या अतुलनीय कामगिरीचे विस्मरण झाल्यामुळेच प्रणिती शिंदे यांनी भारतीय लष्कराच्या 'ऑपरेशन सिंदूर'ला उद्देशून कथित 'तमाशा' म्हटल्याने त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप आमदार कोठे यांनी केला आहे. या वेळी आंदोलनात गाढवाचा वापर करत टीका करण्यात आली. आंदोलनात माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे आदी सहभागी झाले होते.ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकण्यात देशभक्तीचे वाटते. मात्र, प्रत्यक्षात हा माध्यमांमध्ये सरकारचा तमाशा आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सोमवारी लोकसभेत केला. ऑपरेशन सिंदूरमध्ये काय साध्य झाले ? हे कोणीही सांगत नाही. किती दहशतवादी पकडले गेले? भारताने किती लढाऊ विमाने गमावली? ही जबाबदारी कोणाची आहे, चूक कोणाची आहे. यावर सरकारने उत्तर दिले पाहिजे, अशी मागणी प्रणिती शिंदे यांनी केली. विरोधकांच्या प्रश्नांची भिती वाटत असेल तर सरकारने खुर्ची सोडावी, असा घणाघात त्यांनी केला. ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान सभागृहात बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या की, देशात प्रश्न विचारण्यावर बंदी आहे. सरकार प्रश्न ऐकू इच्छित नाही. जबाबदारीपासून सरकार पळ काढत आहे, असा हल्लाबोल खासदार प्रणिती शिंदे यांनी केला. क्रोध, वेदना आणि अपमानाची भावना घेऊन सभागृहात उभी आहे, असे त्या म्हणाल्या. मुख्य मुद्यांपासून नागरिकांचे लक्ष हटवण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. यासाठी खेळ आणि मनोरंजनात जनतेला व्यस्त ठेवले जाते. यामध्ये आता महत्वपूर्ण निवडणूकीपूर्वी दहशतवादी हल्ला असा भर पडला आहे, असा आरोप काँग्रेस खासदार प्रणिती शिंदेंनी केला. दहशतवादी हल्ल्यानंतर मला आपल्या सैनिकांच्या शौर्याबद्दल अजिबात शंका नाही. हल्ल्यापूर्वी पाकिस्तानला माहिती देणे आणि अमेरिकेच्या दबावाखाली शस्त्रसंधी करणे, हे चूकीचे होते, असे शिंदे म्हणाल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा यापूर्वी कधीच इतकी कमकुवत नव्हती, असे त्या म्हणाल्या. एकेकाळी भारताच्या सर्वात जवळ असलेले नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंका आज चीनशी हातमिळवणी करत आहेत. या अपयशाचे उत्तर कोण देणार? शेजारच्या देशांच्या उदासीनतेचे उत्तर कोण देणार असे सवाल त्यांनी केले. प्रत्युत्तरात कारवाई केली जाते.

### 'ऑपरेशन सिंदूर' सरकारचा 'तमाशा'

सरकारला शेजारी देशावर हल्ला करायचा आहे आणि त्याच्या आधारावर मते मिळवायची आहेत, असा आरोप देखील त्यांनी केला. पहलगाम हल्ल्यानंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये निवडणूक सभेला संबोधित करण्यासाठी गेले होते. पंतप्रधान २४/७ निवडणूक मोडमध्ये असतात, असा आरोप खासदार प्रणिती शिंदे यांनी केला.संसदेत सध्या 'ऑपरेशन सिंदूर' वर चर्चा सुरू आहे. या चर्चेत भाग घेताना प्रणिती शिंदे यांनी भाग घेताना भारतीय लष्कराने पाकिस्तानविरोधातच्या माध्यमातून केलेल्या कामगिरीचा 'तमाशा' असा उल्लेख केला आहे. याविरुद्ध सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. याच्याच निषेधार्थ भाजपने आज आंदोलन केले.भाजपच्या सोलापूर जिल्हा कार्यालयाबाहेर झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व आमदार देवेंद्र कोठे यांनी केले.

# गोमूत्र शिंपडून मंत्र्यांना पवित्र करून घ्या

## कोकाटेंना पाठीशी घालण्याच्या निर्णयावर काँग्रेसचे टीकास्त्र

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**विधिमंडळ सभागृहात मोबाईलवर रमीचा गेम खेळताना चित्रफितीत कैद झालेले वादग्रस्त कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना पाठीशी घालण्याच्या निर्णयावरून काँग्रेसने राज्य सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात.**



विधिमंडळात कामकाज सुरू असताना मंत्री रमीचा डाव खेळतात आणि सरकार अशा बेजबाबदार मंत्र्यांचा राजीनामा घेत नाही. कोकाटे यांचा राजीनामा न घेणे म्हणजे सरकार शेतकऱ्यांप्रती असंवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्याचे गृह राज्यमंत्री डान्सबार चालवतात. एका मंत्र्यांकडे पैशाच्या बॅगा सापडतात. पण तरीही यांची पाठराखण जर करण्यात येत असेल तर या सर्व मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे. लाडकी बहिण म्हणायचे आणि बारमध्ये बहिणींना नाचवायचे असा किळसवाणा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात कधी झाला नव्हता, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. नागपूरमधील बारमध्ये अधिकारी फायली घेऊन बसतात. हे अधिकारी गडचिरोलीचे असल्याची माहिती समोर येत आहे. गडचिरोलीचे पालकमंत्री मुख्यमंत्री आहेत, याकडे वडेट्टीवार यांनी लक्ष वेधले.एकीकडे शेतकरी आत्महत्या करत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची बँकाकडे ३५ हजार कोटींची थकबाकी आहे. शेतकरी आता कर्ज घेऊ शकणार नाहीत. शेतकरी अडचणीत आला असून सरकारला त्याचे देणेघेणे नाही. शक्तिपीठ महामार्गाला शेतकरी विरोध करीत आहेत. या महामार्गासाठी सरकार पैसे द्यायला तयार आहे, पण शेतकरी कर्जमाफी मागत असताना त्यासाठी सरकार तयार नाही.

### मंत्र्यांकडे पैशाच्या बॅगा सापडतात

महायुती सरकारमध्ये शीतयुद्ध सुरू आहे. या सरकारमधील दोन पक्षांना सत्तेत टिकून रहायचे असल्याने ते तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत आहेत, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.विधिमंडळात कामकाज सुरू असताना मंत्री रमीचा डाव खेळतात आणि सरकार अशा बेजबाबदार मंत्र्यांचा राजीनामा घेत नाही. कोकाटे यांचा राजीनामा न घेणे म्हणजे सरकार शेतकऱ्यांप्रती असंवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्याचे गृह राज्यमंत्री डान्सबार चालवतात. एका मंत्र्यांकडे पैशाच्या बॅगा सापडतात. पण तरीही यांची पाठराखण जर करण्यात येत असेल तर या सर्व मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे. लाडकी बहिण म्हणायचे आणि बारमध्ये बहिणींना नाचवायचे असा किळसवाणा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात कधी झाला नव्हता.

# विरांच्या पराक्रमाला जगाचा पाठिंबा!

## ऑपरेशन सिंदूरबाबतही पंतप्रधान मोदी यांनी सविस्तर माहिती

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याची घटना आणि त्यानंतर भारतीय सैन्यदलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भात संसदेत चर्चा सुरू आहे. ऑपरेशन सिंदूरसंदर्भात चर्चा पार पडत असताना सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येत असल्याचं पाहायला मिळत आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरवरून आणि भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीवरून अनेक प्रश्न विचारले आहेत. त्यावर आज (२९ जुलै) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर दिलं. तसेच ऑपरेशन सिंदूरबाबतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सविस्तर माहिती संसदेत दिली.**



ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानकडून देण्यात आलेल्या अणुबॉम्बच्या धमक्यांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाष्य केलं. तसेच ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताला कोणत्या देशांनी पाठिंबा दिला होता याची देखील माहिती मोदींनी सांगितली. देशातील विरांच्या पराक्रमाला जगाचा पाठिंबा मिळाला, पण काँग्रेसचा पाठिंबा मिळाला नसल्याचं म्हणत पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर टीका केली आहे."विरोधकांनी भारताच्या परराष्ट्र धोरणावरही बरीच टीका केली. तसेच ऑपरेशन सिंदूर संदर्भात जगातील देशांनी दिलेल्या पाठिंब्याबाबतही बरीच चर्चा झाली. मात्र, आज मी स्पष्ट करू इच्छितो की जगातील कोणत्याही देशाने भारताला आपल्या सुरक्षेसाठी कारवाई करताना कोणीही रोखलं नाही. ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान संयुक्त राष्ट्र, १९३ देशांपैकी फक्त पाकिस्तानच्या बाजूने तीनच देश बोलत होते. फ्रान्स, ग्रीस, जर्मनी आणि कोणत्याही देशाचं नाव घ्या. संपूर्ण जगाने भारताला समर्थन दिलं. संपूर्ण जगभरातील देशांचा भारताला पाठिंबा मिळाला. पण दे दुर्दैव आहे की देशाच्या जवानांच्या शौर्याला काँग्रेसचा पाठिंबा मिळाला नाही", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑपरेशन सिंदूर' संदर्भात भारताची बाजू मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. तसेच ज्यांना भारताची बाजू दिसत नाही, त्यांना आरसा दाखवण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. हा विजयोत्सव भारतीय सैन्याचा शौर्याचा आहे. दहशतवाद्यांना मातीत गाडलं त्याचा हा विजयोत्सव आहे. दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या. तसेच भारतात दंगली घडवण्याचा कट होता.

मात्र, देशाने हा प्रयत्न हाणून पाडला. मी तेव्हाच सांगितलं होतं की दहशतवाद्यांना आम्ही मातीत मिळवल्याशिवाय राहणार नाही. हे देखील सांगितलं होतं की दहशतवाद्यांच्या आकांना देखील सजा मिळेल. एवढंच नाही तर कल्पनेच्याही पलिकडे सजा मिळेल असंही सांगितलं होतं", असं मोदींनी म्हटलं.यांनी म्हटलं आहे.आम्हाला गर्व आहे की दहशतवाद्यांना आम्ही शिक्षा दिली. ती शिक्षा अशी होती की दहशतवाद्यांच्या म्होरक्यांची झोप उडाली आहे.

पहलगाम हल्ला झाल्यानंतरच पाकिस्तानला समजलं होतं भारत काहीतरी मोठं पाऊल उचलणार आहे. ६ मे च्या रात्री आम्ही २२ मिनिटांत २२ एप्रिलचा बदला आपल्या सैन्य दलांनी घेतला. पहिल्यांदा असं घडलं की पाकिस्तानच्या कानाकोपऱ्यातले दहशतवादी तळ आपण उद्ध्वस्त केले. बहावलपूर, मुरिके हेदेखील आपण जमीनदोस्त केलं. पाकिस्तानच्या अणुशक्तीच्या धमकीला आपण खोटं ठरवून दाखवलं. न्यूक्लिअर ब्लॅकमेलिंग नाही चालणार आणि त्यापुढे भारत झुकणार नाही हे देखील आम्ही दाखवून दिली. भारताने आपली तांत्रिक ताकद दाखवून दिले. पाकिस्तानच्या छातीवर आपण अचूक प्रहार केले. पाकिस्तानचे हवाई तळ आपण उद्ध्वस्त केले.

### 22 मिनिटांत 22 एप्रिलचा बदला घेतला

टेक्नॉलॉजीशी आधारे युद्ध करण्याचे हे दिवस आहेत. ऑपरेशन सिंदूरला यातही यश मिळालं आहे. मागच्या दहा वर्षांत आपण जी तयारी केली आहे ती केली नसती तर आपला टिकाव लागणं कठीण होतं", असंही मोदी यांनी म्हटलं आहे.ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानकडून देण्यात आलेल्या अणुबॉम्बच्या धमक्यांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाष्य केलं. तसेच ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताला कोणत्या देशांनी पाठिंबा दिला होता याची देखील माहिती मोदींनी सांगितली. देशातील विरांच्या पराक्रमाला जगाचा पाठिंबा मिळाला, पण काँग्रेसचा पाठिंबा मिळाला नसल्याचं म्हणत पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर टीका केली आहे. तसेच ऑपरेशन सिंदूर संदर्भात जगातील देशांनी दिलेल्या पाठिंब्याबाबतही बरीच चर्चा झाली.

# ३० मिनिटांमध्ये पाकिस्तानसमोर सरेंडर केलं!

## राजनाथच्याच वक्तव्याचा दाखला देत राहुल गांधींची टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याची घटना आणि त्यानंतर भारतीय सैन्यदलाने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भात सध्या संसदेत चर्चा सुरू आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरसंदर्भात चर्चा पार पडत आहे. या चर्चेवेळी सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येत असल्याचं पाहायला मिळत आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरवरून आणि भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीवरून अनेक सवाल विचारले आहेत.**



आज लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत बोलताना भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीवरून धारेवर धरलं आहे. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या वक्तव्याचा दाखला राहुल गांधी यांनी सरकारवर जोरदार टीका केली. भारताने ३० मिनिटांमध्ये पाकिस्तानसमोर सरेंडर केलं म्हणत राहुल गांधींनी भारत सरकारवर घणाघात केला.पहलगाममध्ये क्रूर दहशतवादी हल्ला झाला. पहलगाम हल्ल्यानंतर सर्वपक्ष सरकारच्या आणि सैन्याबरोबर उभे होते. पहलगाम हल्ल्यानंतर मृत्युमुखी पडलेल्यांच्या एका कुटुंबियांच्या घरी गेलो होतो. तेव्हा मला वाटलं की मी माझ्या कुटुंबियाबरोबर बसलो आहे.

तेव्हा त्यांनी मला त्यांच्या मुलाचे काही फोटो दाखवले. त्यानंतर मी उत्तर प्रदेशातील आणखी एका कुटुंबियाला भेटलो. पतीला पत्नीसमोर गोळी झाडल्याचं मला त्यांनी सांगितलं. खरं तर या घटनेबाबत ऐकलं तरी खूप दु:ख होतं. जी घटना झाली ती खूप चुकीची झाली. आम्ही राजकारणात काम करत असताना जनतेत जात असतो. जेव्हा मी काही जवानांना भेटतो तेव्हा त्यांचा हात हातात घेतला तरी समजतं की हे भारतीय जवान आहेत. खरं तर भारतीय सैन्य म्हणजे वाघ आहेत. त्यामुळे वाघाला पूर्ण स्वातंत्र्य द्यावं लागतं", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

### राहुल गांधी काय म्हणाले?

भारतीय सेना आणि भारतीय नेव्हीचा प्रयोग जर करायचा असेल तर त्यासाठी तुमच्याबरोबर १०० टक्के पाठिंबा असला पाहिजे. जर सैन्याचा प्रयोग करायचा असेल तर सैन्याला पूर्ण सूट द्यायला हवी. भारतीय सैन्य म्हणजे वाघ आहेत. त्यामुळे वाघाला पूर्ण स्वातंत्र्य द्यावं लागतं. भारतीय सैन्याला एखाद्या ऑपरेशनसाठी पूर्ण सूट द्यायला हवी", असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी दावा केला की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ऑपरेशन सिंदूर दरम्यान डीजीएमओंना लष्करी कारवाईमध्ये वाढ न करण्याचे निर्देश दिले होतेआम्ही पाकिस्तानच्या बिगर-लष्करी भागावर हल्ला केला, या संदर्भातील राजनाथ सिंह यांच्या विधानाचा दाखला देत भारताने ३० मिनिटांमध्ये पाकिस्तानसमोर सरेंडर केलं असं म्हणत केंद्र सरकारवर राहुल गांधी यांनी टीका केली.

# मराठी अभिनेत्रीच्या 28 वर्षीय लेकीने घेतलं नवीन घर!

आई अन् लेकीचं नातं कायम खास असतं. आपल्या आईची सगळी स्वप्न पूर्ण व्हावीत, आपल्या आईच्या मनाप्रमाणे सगळ्या गोष्टी झाल्या पाहिजेत अशी इच्छा प्रत्येक मुलीची असते. सध्या मराठी कलाविश्वातील अशाच एका मायलेकीच्या जोडीची सर्वत्र चर्चा होत आहे. यामागचं कारणही खूपच खास आहे...ते म्हणजे लोकप्रिय मराठी अभिनेत्रीच्या लेकीने आपल्या आईला तिच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त नव्या घराच्या रुपात खास गिफ्ट दिलं आहे. आपलं हक्काचं घर असावं असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. लोकप्रिय अभिनेत्री रसिका धामणकर यांच्या लेकीने सुद्धा स्वत:च्या हक्काच्या घराचं स्वप्न काही वर्षांपूर्वी पाहिलं होतं. अंतराचं हे स्वप्न वयाच्या २८ व्या वर्षी पूर्ण झालं आहे. तिने लाडक्या आईला नवीन घर भेट म्हणून दिलं आहे. रसिका धामणकर व त्यांच्या कुटुंबाने या नव्या घरात नुकताच गृहप्रवेश केला. याचा व्हिडीओ अभिनेत्रीच्या लेकीने इन्स्टाग्रामवर शेअर करत खास पोस्ट लिहिली आहे.रसिका धामणकर यांची लेक अंतरा लिहिते,




"आमचं घर माझ्या बाबांची मेहनत, परिश्रम आणि माझ्या आईच्या प्रेमाने एकत्र बांधलं गेलं आहे. लहापणापासून मी एक स्वप्न पाहिलं होतं, ते म्हणजे माझं हक्काचं, स्वत:चं नाव असलेलं सुंदर घर असावं. मुंबई मैं अपना घर...मी स्वत:च्या मनाशी निश्चय केला होता, जेव्हा मी पहिलं घर घेईन ते माझ्या आईचं असेल. ते घर माझ्या आईसाठी असेल, मी तिला गिफ्ट देईन. वयाच्या २८ व्या वर्षी ते स्वप्न खरं झालं. २०२५ या वर्षात माझ्या आयुष्यात अनेक बदल झाले...

## 'सीतारे जमीन पर' युट्यूबवर होणार प्रदर्शित

आमिर खानचा बहुचर्चित चित्रपट 'सितारे जमीन पर' पाहण्यासाठी थिएटरमध्ये जाऊ न शकलेल्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आमिर खान हा चित्रपट यूट्यूबवर प्रदर्शित करत आहे. तुम्ही तो यूट्यूब मूव्हीज-ऑन-डिमांडवर घरी बसून पाहू शकता. याबरोबरच हा चित्रपट इतर कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार नाही. त्याचा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. ओटीटीच्या वाढत्या क्रेझमध्ये, आमिरने यापूर्वी तो ऑनलाइन प्रदर्शित न करण्याची घोषणा केली होती.आमिर खानने चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर ओटीटीऐवजी यूट्यूब मूव्हीज ऑन डिमांडवर 'सितारे जमीन पर' प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. जगभरातील लोकांपर्यंत हा चित्रपट कमी किमतीत पोहोचावा अशी त्याची इच्छा आहे. हा चित्रपट फक्त यूट्यूबवर उपलब्ध असेल आणि इतर कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार नाही. १ ऑगस्टपासून १०० रुपयांना तो यूट्यूबवर पाहता येईल.भारतात हा चित्रपट १०० रुपयांना उपलब्ध असेल; तर अमेरिका, कॅनडा, यूके, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इंडोनेशिया, फिलीपिन्स, सिंगापूर आणि स्पेनसह ३८ देशांमध्ये तो स्थानिक किंमतीसह उपलब्ध असेल.सितारे जमीन पर' हा चित्रपट यूट्यूबवर प्रदर्शित झाल्यानंतर येत्या काळात आमिर खान प्रॉडक्शनचे इतर आवडते चित्रपटदेखील या प्लॅटफॉर्मवर दाखवले जातील असे म्हटले जात आहे.

## 'मैं अलबेली' गाण्यावर डान्स!



'पुण्यश्लोक अहिल्याबाई', 'कन्नी', 'नवरी मिळे हिटलरला', अशा मालिका, चित्रपट यांमधून अभिनेत्री वल्लरी विराजने मनोरंजनसृष्टीत तिची ओळख निर्माण केली आहे. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित झालेल्या नवरी मिळे हिटलरला या मालिकेतून वल्लरी विराजने प्रेक्षकांचे मन जिंकले. या मालिकेत तिने लीला ही भूमिका साकारली होती. थोडी अल्लड, गोंधळ घालणारी पण तितकीच प्रेमळ, संकटांना धाडसाने सामोरी जाणारी, कुटुंबासाठी काहीही करण्याची तयारी असणारी लीला प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत होती. याबरोबरच, लीला व एजे यांची केमिस्ट्रीदेखील प्रेक्षकांच्या पसंतीस पडली होती.आता या मालिकेनंतर अभिनेत्री कोणत्या मालिकेतून अथवा चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असतात. दरम्यानच्या काळात वल्लरी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसते. अभिनयाबरोबरच तिला नृत्याचीदेखील आवड असल्याचे दिसते.वल्लरी विराज सोशल मीडियावर तिच्या डान्सचे अनेक व्हिडीओ शेअर करताना दिसते. अनेकदा तिच्याबरोबर अभिनेत्री आलापिनीदेखील दिसते. आलापिनी आणि वल्लरीने मालिकेत बहिणींची भूमिका साकारली होती. मालिकेदरम्यान त्यांच्यात उत्तम मैत्री झाल्याचे पाहायला मिळते. याबरोबरच, त्यांच्या एकत्रित डान्स व्हिडीओंना प्रेक्षकांचे मोठे प्रेम मिळताना दिसते. त्यांचे हावभाव चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसतात.आता अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. 'मैं अलबेली' या गाण्यावर तिने सुंदर डान्स केला आहे. या गाण्यावरील डान्स स्टेप्स लक्ष वेधून घेत आहेत.

## 'चकदा एक्स्प्रेस' प्रदर्शित होणार नाही?

अनुष्का शर्मा २०२१ मध्ये मुलीच्या जन्मानंतर अभिनयक्षेत्रात पुनरागमन करण्यास सज्ज होती. त्यावेळी तिने झूलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित चरित्रपटाचं 'चकदा एक्स्प्रेस'चं चित्रीकरण पूर्ण केलं होतं. यामध्ये रेणुका शहाणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. परंतु, आता चित्रपट प्रदर्शित होणार नसल्याबाबत त्यांनी प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली आहे. 'चकदा एक्स्प्रेस' हा चित्रपट माजी भारतीय महिला क्रिकेटर झूलन गोस्वामी यांच्यावर आधारित आहे. यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्माने मुख्य भूमिका साकारली आहे. परंतु, अद्याप हा चित्रपट प्रदर्शित झाला नाहीये. 'फ्री प्रेस जरनल'च्या वृत्तानुसार पूर्वी हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार होता. परंतु,काही कारणांनी ती डील रद्द झाली. आता यातील अभिनेत्री रेणुका शहाणे यांनी याबाबत त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.माध्यमांच्या वृत्तानुसार आता हा चित्रपट प्रदर्शित होणार नसल्याचं म्हटलं जात आहे. चित्रपटाचं संपूर्ण चित्रीकरण पूर्ण झाल्यामुळे ही धक्कादायक गोष्ट आहे. अशातच आता रेणुका यांनीसुद्धा नाराजी व्यक्त केल्याचं दिसतं. यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. आता त्यांनी 'एनडी टीव्ही'शी संवाद साधताना याबाबत सांगितलं.रेणुका म्हणाल्या, "मला खूप वाईट वाटलं, कारण या चित्रपटासाठी प्रत्येकाने खूप मेहनत घेतली होती. अनुष्कानेही यासाठी स्वत:वर खूप काम केलं होतं. यामध्ये मी जे सीन केले ते खूप चांगले होते आणि म्हत्त्वपूर्ण होते. विशेष करून क्रीडा क्षेत्रातील स्त्रियांसाठी हा चित्रपट फार महत्त्वाचा आहे."

## 'ऑपरेशन महादेव'च्या यशाबद्दल अनुपम खेर यांची प्रतिक्रिया

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी दहशतवादी हल्ला झाला होता आणि या हल्ल्यात एकूण २६ पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले होते. या भ्याड हल्ल्यानंतर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या होत्या. सर्वच क्षेत्रातून या घटनेचा निषेध करण्यात आला होता. बॉलीवूड विश्वातील अनेक कलाकारांनीही या घटनेवर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. अशातच जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल भारतीय सैन्याने 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत प्रत्युत्तरात्मक कारवाई केली. यात भारतीय सैन्याने तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. याबद्दल भारतीय सैन्याचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे, अशातच बॉलीवूड अभिनेते अनुपम खेर यांनीसुद्धा सरकार आणि सैन्याचं कौतुक केलं आहे. अनुपम खेर यांनी 'ऑपरेशन महादेव'च्या



यशाबद्दल 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीत अनुपम खेर म्हणाले, "ज्या लोकांनी अमानुषपणे आपले २६ नागरिक मारले, अशा गुन्हेगारांचा अंत केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. अशा गोष्टी एका रात्रीत होत नाहीत. यासाठी संयम लागतो आणि योग्य वेळेचीही वाट पाहावी लागते."यापुढे ते म्हणाले, "ही कारवाई गरजेची होती आणि ती यशस्वीपणे झाली; याबद्दल मला आपल्या भारतीय सैन्याचा अभिमान आहे. धर्माच्या आधारावर आपण निष्पाप नागरिकांचे गेलेले बळी आणि पत्नीसमोर झालेले असे निर्दयी खून सोडून दिले, तर त्यापेक्षा अमानवी काहीच असू शकत नाही. त्यामुळे दहशतवाद्यांना धडा शिकवण्याची ही योग्य वेळ होती आणि सैन्याने ते करून दाखवलं."भारतीय लष्कराने जम्मू-काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफच्या सहकार्याने श्रीनगरमध्ये सोमवार (२८ जुलै) रोजी 'ऑपरेशन महादेव' सुरू केले.

# आम्हाला ऐकून धक्काच बसला!

## गौतम गंभीर ओव्हलच्या पिच क्युरेटरवर का संतापला?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा कसोटी सामना लंडन ओव्हलच्या मैदानावर होणार आहे. या सामन्याच्या सराव सत्रादरम्यान कोच गौतम गंभीर आणि पिच क्यूरेटर यांच्यात वाद झाला. गंभीर आणि पिट क्यूरेटर यांच्यात नेमका वाद कशामुळे झाला याचं कारण समोर आलं आहे. पत्रकार परषदेत भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी मैदानावर नेमकं काय घडलं याची माहिती दिली.**






मँचेस्टर कसोटीनंतर भारताचा संघ २८ जुलै रोजी लंडनमध्ये दाखल झाला. यानंतर आज २९ जुलैला भारतीय संघ पहिल्या सराव सत्रासाठी मैदानावर उतरला. यादरम्यान गौतम गंभीर आणि पिच क्युरेटर यांच्यात मोठा वाद झाला. पिच क्युरेटरने गौतम गंभीरची तक्रार करण्याची धमकीही दिली. यानंतर गंभीरचा पारा चढला आणि तो अजून संतापला. पण असं नेमकं काय घडलं की इतका मोठा वाद झाला, जाणून घेऊया. भारताचे फलंदाजी कोच सितांशु कोटक म्हणाले, "जेव्हा आम्ही खेळपट्टी पाहण्यासाठी गेलो, तेव्हा त्यांनी एका माणसाला पाठवून आम्हाला खेळपट्टीपासून २.५ मीटर दूर राहण्यास सांगितलं. आम्हाला हे ऐकून चकित झालं. सामना तोंडावर आहे आणि आम्ही जॉगर्स घालून पोहोचलो होतो. आम्हाला थोडं विचित्र वाटलं. आम्ही सर्वजण खूप क्रिकेट खेळलोय आणि मैदानावर वेळही घालवला आहे. मैदानाबाबत क्युरेटर्सना आपुलकी असतेच, पण त्यांनाही याची कल्पना हवी की ते ज्यांच्याशी बोलत आहेत ते लोकही अत्यंत कुशल आणि हुशार आहेत."फलंदाजी कोच पुढे म्हणाले, "तुम्ही पाहिलंत तर, कोणताही गोलंदाज स्पाईक्स घालून नव्हता. मैदान, खेळपट्टी खराब झाली नाही पाहिजे, हे आम्हालाही माहित आहे. अखेरीस ती क्रिकेटची खेळपट्टी आहे, २०० वर्षांपूर्वीची प्राचीन शोभेची वस्तू नाहीये की जी खराब होईल आणि फुटेल. आज आम्ही रबराचा तळ असलेले शूज घातले होते."पिच क्युरेटर रोलरवर बसलेला होता आणि तिथूनच त्याने सपोर्ट स्टाफवर ओरडून त्यांना कूलर मैदानावर नेऊ नका असं सांगितलं. कुलर मैदानावर नेऊ नकोस हे तो सांगत होता. त्या कुलिंग बॉक्सचं वजन १० किलो होतं, त्याने इतका काही फरक पडणार नव्हता. खेळपट्टीबद्दल काळजी असणं चांगलचं आहे, पण इतकंही नाही. सपोर्ट स्टाफ हा मुख्य प्रशिक्षकाच्या हाताखाली काम करतो, त्यामुळे गौतम गंभीर त्याला सांगणारच की असं बोललं नाही पाहिजे.", असं कोटक पुढे म्हणाले.प्रामाणिकपणे सांगायचं तर, ओव्हलवर येण्यापूर्वीच बहुतांश संघांना माहिती असतं की तिथल्या क्युरेटरशी जुळवून घेणं सोपं नाही," असं सितांशु कोटक म्हणाले.मँचेस्टर कसोटीनंतर भारताचा संघ २८ जुलै रोजी लंडनमध्ये दाखल झाला. यानंतर आज २९ जुलैला भारतीय संघ पहिल्या सराव सत्रासाठी मैदानावर उतरला. यादरम्यान गौतम गंभीर आणि पिच क्युरेटर यांच्यात मोठा वाद झाला. पिच क्युरेटरने गौतम गंभीरची तक्रार करण्याची धमकीही दिली. यानंतर गंभीरचा पारा चढला आणि तो अजून संतापला. पण असं नेमकं काय घडलं की इतका मोठा वाद झाला, जाणून घेऊया. भारताचे फलंदाजी कोच सितांशु कोटक म्हणाले, "जेव्हा आम्ही खेळपट्टी पाहण्यासाठी गेलो, तेव्हा त्यांनी एका माणसाला पाठवून आम्हाला खेळपट्टीपासून २.५ मीटर दूर राहण्यास सांगितलं. आम्हाला हे ऐकून चकित झालं. सामना तोंडावर आहे.

### क्युरेटरशी जुळवून घेणं सोपं नाही

आम्ही सर्वजण खूप क्रिकेट खेळलोय आणि मैदानावर वेळही घालवला आहे. मैदानाबाबत क्युरेटर्सना आपुलकी असतेच, पण त्यांनाही याची कल्पना हवी की ते ज्यांच्याशी बोलत आहेत ते लोकही अत्यंत कुशल आणि हुशार आहेत."फलंदाजी कोच पुढे म्हणाले, "तुम्ही पाहिलंत तर, कोणताही गोलंदाज स्पाईक्स घालून नव्हता. मैदान, खेळपट्टी खराब झाली नाही पाहिजे, हे आम्हालाही माहित आहे. अखेरीस ती क्रिकेटची खेळपट्टी आहे, २०० वर्षांपूर्वीची प्राचीन शोभेची वस्तू नाहीये की जी खराब होईल आणि फुटेल. आज आम्ही रबराचा तळ असलेले शूज घातले होते."पिच क्युरेटर रोलरवर बसलेला होता आणि तिथूनच त्याने सपोर्ट स्टाफवर ओरडून त्यांना कूलर मैदानावर नेऊ नका असं सांगितलं. कुलर मैदानावर नेऊ नकोस हे तो सांगत होता. त्या कुलिंग बॉक्सचं वजन १० किलो होतं, त्याने इतका काही फरक पडणार नव्हता. खेळपट्टीबद्दल काळजी असणं चांगलचं आहे, पण इतकंही नाही.

# दिव्या देशमुखची अद्भुत घोडदौड!

## विश्वचषक जेतेपदाबरोबरच ग्रँडमास्टर किताबावरही मोहोर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नागपूरच्या मराठमोळ्या दिव्या देशमुखने बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताच्याच कोनेरू हम्पीला टायब्रेकरमध्ये हरवून सोमवारी विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. या अद्भुत आणि स्वप्नवत कामगिरीच्या जोरावर दिव्याने 'गॅंडमास्टर' हा सर्वोच्च किताबही मिळवला. विश्वचषक जिंकणारी दिव्या विश्वनाथन आनंदनंतरची दुसरी भारतीय, तर ग्रँडमास्टर किताब पटकावणारी केवळ चौथी भारतीय महिला ठरली.**



जॉर्जिया येथे स्पर्धेच्या सुरुवातीस दिव्याकडून चमकदार कामगिरीची अपेक्षा होती. परंतु कोनेरु हम्पी, हरिका द्रोणवल्ली, आर. वैशाली या भारतीय ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू, किमान अर्धा डझन उत्कृष्ट चिनी प्रतिस्पर्धी, अनेक देशांच्या दिग्गज बुद्धिबळपटूंच्या गर्दीत दिव्याकडून अजिंक्यपदाच्या अपेक्षा बाळगल्या जात नव्हत्या.मात्र आंतरराष्ट्रीय मास्टर म्हणून स्पर्धेत दाखल झालेल्या दिव्याने अखेरच्या चार फेऱ्यांमध्ये जू झिनर (चीन), हरिका द्रोणवल्ली, तान झोंग्यी (चीन) आणि कोनेरू हम्पी या सर्व ग्रँडमास्टर प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत असाधारण सातत्य दाखवले.

### 'गॅंडमास्टर' किताबही मिळवला

विजयी मानसिकतेचे दर्शन घडवले. हम्पीवरील तिचा विजय विशेष उल्लेखनीय ठरतो. कारण मुख्य लढतीमधील कोंडी फोडण्यासाठी रॅपिड टायब्रेकरचा अवलंब करण्यात आला आणि या प्रकारात हम्पी विद्यामान जगज्जेती आहे.गेल्या वर्षी दिव्याने जागतिक ज्युनियर स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले होते. तसेच भारतीय महिला संघाने पुरुषांबरोबरच बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले, त्या विजयात दिव्याचेही अमूल्य योगदान राहिले. आता विश्वचषक स्पर्धेच्या अजिंक्यपदामुळे ती आणि उपविजेती हम्पी बुद्धिबळ कँडिडेट्स स्पर्धेसाठी थेट पात्र ठरले. या स्पर्धेतून चीनची जगज्जेती जु वेनजुन हिची आव्हानवीर ठरवली जाईल. पण मोठ्या स्पर्धांमध्ये तगड्या प्रतिस्पर्ध्यांशी खेळण्याचा, त्यांच्याशी जिंकण्याचा अनुभव गाठीशी असल्यामुळे १९ वर्षीय दिव्याकडून या आणि अशा अनेक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा बाळगता येईल.या स्पर्धेपूर्वी मी ग्रँडमास्टर किताबासाठीचा एकही निकष पूर्ण केला नव्हता.

DYP Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

D Y PATIL COLLEGE OF ENGINEERING AKURDI, PUNE
(An Autonomous Institute)

Accredited by NBA

Accredited with 'A' Grade by NAAC

Institute Code -EN-6272

# ELIGIBILITY CRITERIA

## UNDERGRADUATE

### AFTER DIPLOMA

- Should have passed Diploma in Engineering and technology by obtaining at least 50% marks.

### AFTER HSC

- The aspirant should be an Indian National.
- Should Have passed HSC or its equivalent examination with Physics and Mathematics as compulsory subject along with one of the Chemistry or Biotechnology or Biology or Technical Vocational Subject.
- Should have obtained at least 50% marks should have appeared in all the subject in MHT CET 2024.

## POSTGRADUATE

- B.E./ B.Tech Degree in respective branch and Non Zero Score in GATE EXAM 2024



+91-20-27653054/58 info@dypcoeakurdi.ac.in dypcoeakurdi.ac.in @dypakurdipune

# पीसीसीओईआरला स्वायत्तता म्हणजे स्वतंत्र ओळख!

## ज्ञानेश्वर लांडगे : पीसीसीओईआर मध्ये नियामक मंडळाची पहिली बैठक संपन्न

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अभियांत्रिकी शैक्षणिक क्षेत्रात जागतिक पातळीवर अभिमानाने नाव घेतले जाते. या ट्रस्ट अंतर्गत रावेत येथे २०१४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) या महाविद्यालयाने अल्पावधीतच स्वायत्तता मिळवली आहे. आता हे महाविद्यालय स्वतंत्र ओळख निर्माण करून आणखी तांत्रिक कुशल मनुष्यबळ करेल असा विश्वास पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी व्यक्त केला.**



पीसीईटीच्या रावेत येथील पीसीसीओईआर मध्ये नियामक मंडळाची २०२५- २६ या शैक्षणिक वर्षाची पहिली बैठक संपन्न झाली.

यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे बोलत होते. यावेळी उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, विशेष निमंत्रित शिक्षण तज्ञ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर तसेच प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार, श्रीकांत पाटील, डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. राहुल मापारी आदी उपस्थित होते. लांडगे यांनी सांगितले की, या महाविद्यालयात कॉम्प्युटर, आयटी, इ अँड टीसी, मेकॅनिकल, सिव्हिल या अभियांत्रिकीच्या पदवीसह बीबीए आणि बीसीए एक कोर्स शिकवले जातात. आतापर्यंत २५०० पेक्षा जास्त अभियंते येथे घडले आहेत आणि ते देशाच्या कानाकोपऱ्यात तसेच परदेशात कार्यरत आहेत. येथे विद्यार्थ्यांसाठी अध्यायावत उच्च तंत्रज्ञान नियुक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत तसेच बहुतांशी प्राध्यापकांनी पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी कृती अहवाल सादर केला. या अहवालात कॉलेजला मिळालेले "नॅक ए प्लस प्लस" मानांकन, युजीसीचे एनबीए मानांकन आणि आयएसओ प्रमाणपत्र, शैक्षणिक स्वायत्तता याचा समावेश होता. तसेच संशोधन प्रकाशन, उद्योग प्रायोजित प्रयोगशाळांना प्रोत्साहन, सल्लागार आणि निधी प्रकल्पांचे प्रमाण, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उद्योजकता सुधारणे यासारख्या विषयांवर २०२५ - २०३० च्या धोरणात्मक सादरीकरण करण्यात आले.

या बैठकीत नियामक मंडळाकडून स्वायत्तेखाली शैक्षणिक परिषद, अभ्यास मंडळ, परीक्षा मंडळ, वित्त समिती, आयक्यूएसी इतर शैक्षणिक सुविधा व सुधारणा अशा वैधानिक समित्यांच्या स्थापनेला मान्यता देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रादेशिक आव्हानांना सामोरे जावे असे प्रा. डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

उद्योग संस्थाच्या मदतीने आणि एआय वर आधारित नवीन तंत्रज्ञानाच्या सहकार्याने नवनवीन विकास उपक्रम सुरू केले आहेत त्याचे प्रा. डॉ. प्रफुल पवार यांनी समर्थन केले.

ट्रेन द ट्रेनर या कार्यक्रमाला श्रीकांत पाटील यांनी पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

उपसंचालक डॉ. राहुल मापारी यांनी स्वागत केले.



# MIT कॉलेजमध्ये "Smallest AI Hackathon 2025" अंतर्गत मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात!

## शिक्षण विश्व: हॅकाथॉन स्पर्धांमध्ये प्रभावी सहभागासाठी विद्यार्थ्यांना मिळाले तज्ज्ञांचे मार्गदर्शन

। पुणे ।

प्रतिनिधी । महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, आळंदी (डि.), पुणे येथील SCI TECH CLUB तर्फे "SMALLEST AI HACKATHON 2025" या उपक्रमाच्या अनुषंगाने "हॅकाथॉन स्पर्धांमध्ये प्रभावी सहभागासाठी मार्गदर्शन" या विषयावर एक विशेष कार्यशाळा २५ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



या विशेष सत्राचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. विजय माने (डीन – ॲनालिटिक्स व तांत्रिक उपक्रम समन्वयक, VIT पुणे) होते. त्यांनी विद्यार्थ्यांना हॅकाथॉनमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली तयारी, संघभावना, नवोन्मेष (INNOVATION), आणि प्रोटोटायपिंग या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. हॅकाथॉन म्हणजे केवळ कोडिंग नव्हे, तर समस्या समजून घेऊन नावीन्यपूर्ण उपाय सुचविण्याची प्रक्रिया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेत एकूण १६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आगामी SMALLEST AI HACKATHON 2025 स्पर्धेसाठी ६० टीम्स आणि एकूण ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे.

या कार्यक्रमात कॉलेजचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सुनील महाजन (डीन – विद्यार्थी कल्याण), डॉ. शितल घोटेकर (SCI TECH CLUB समन्वयक), तसेच SCI TECH टीम यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना हॅकाथॉनसाठी अधिक सज्ज करण्यास उपयुक्त ठरली असून, नव्या कल्पनांना दिशा देणारा हा उपक्रम ठरल्याचे मत अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING MIND & HEART

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic
Empowering
Learning

IT ALL STARTS HERE



42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

600+
TEACHING AND NON TEACHING STAFF

13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org